संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अधिनस्त वाहन क्रमांक एमएच १२ एएच ७०८९ (होंडा सिटी) च्या दुरूस्तीवरील झालेल्या खर्चास मंजूरी.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः वाहनदुरूस्ती-२०१५/ प्र.क्र.१८६/ आरोग्य-४

मंत्रालय, १० वा मजला, संकूल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.
तारीख: १५ जानेवारी, २०१६.

वाचा

१) **सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/ आस्था/ कक्ष-५/ टे-२/ वा. दु. प्रशा.मान्यता/ २३१८-२०/१५, दि.२९.०९.२०१५.**

प्रस्तावना

संदर्भाधीन पत्रान्वये संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अधिनस्त असलेले व मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांच्या वापरात असलेल्या वाहन क्रमांक एमएच-१२ एएच ७०८९ (होंडा सिटी) या वाहनाच्या दुरूस्तीकरीता सन २०१५-१६ या वर्षात झालेल्या खर्चास मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर वाहन दुरूस्तीकरीता एकूण रूपये १,५७,४८९/- (अक्षरी रूपये एक लक्ष सत्तावन्न हजार चारशे एकोणनव्वद मात्र) इतका खर्च झालेला असून या खर्चाची देयके शासनास प्राप्त झालेली आहेत. तसेच सदर वाहनाच्या दुरूस्तीवरील झालेला खर्च योग्य असल्याबाबत सेवा व्यवस्थापक, जिल्हा कार्यशाळा, आरोग्य सेवा, मुंबई यांनी प्रमाणित केलेले आहे. या अनुषंगाने सदर वाहनावरील दुरूस्ती खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

या शासन निर्णयान्वये संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अधिनस्त व सद्यस्थितीत मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांच्या वापरात असलेल्या वाहन क्रमांक एमएच-१२ एएच ७०८९ (होंडा सिटी) या वाहनाच्या दुरूस्तीवर सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात झालेल्या एकूण रूपये १,५७,४८९/- (अक्षरी रूपये एक लक्ष सत्तावन्न हजार चारशे एकोणनव्वद मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/ विनियम,भाग-२, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील भाग-पहिला, उपविभाग-२ मधील अनुक्रमांक १९ येथील नियम क्रमांक ६९ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११६१२३४४५३३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok T Uike

Digitally signed by Ashok T Uike
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Ashok T Uike
Date: 2016.01.16 16:42:10 +05'30'

अ.ता.उईके
अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
२. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा),आरोग्य सेवा, पुणे.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
७. महालेखापाल १ / २, महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा) / लेखा व अनुज्ञेयता, मुंबई/ नागपूर.
८. विनियम कार्यासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१०.निवडनस्ती (आरोग्य-४).